**फौजदारी जामीन अर्ज क्र. ४४/२०२६**
**श्रीखंड देविदास होळकर**
**वि.**
**महाराष्ट्र शासन**
**(CNR NO. MHBU20-000099-2026)**

## नि.क्र. १ खाली आदेश
**(पारीत दिनांक ११ मार्च २०२६)**

**०१]** प्रस्तुतचा अर्ज अर्जदार – **श्रीखंड देविदास होळकर** याने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८२ अन्वये अटकपूर्व जामीन मिळण्याकामी दाखल केला.

**०२]** अभियोग पक्षाच्या कथेनुसार दिनांक ११.०२.२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेच्या सुमारास फिर्यादीचे आई-वडील हे शेतात गेलेले असतांना, फिर्यादी घरी एकटी हजर होती. त्यावेळी आरोपी श्रीखंड देविदास होळकर हा दारु पिऊन आला आणि फिर्यादीचे घरात येऊन तिला,''महारे, देहाडे, मोकाटे, छिन्नाल अशा जातीवाचक व अश्लिल भाषेत शिवीगाळ करु लागला. फिर्यादी घरातुन बाहेर आली असता, आरोपी सुध्दा तिच्या मागे घराचे बाहेर आला आणि तिला शिवीगाळ करु लागला. फिर्यादी त्याला म्हणाली की, मामा शिवीगाळ का करता. तेंव्हा आरोपीने तिला तुझे मायला झव, महारणी असे म्हणत तिचे केस धरुन खाली पाडले आणि चापटाबुक्क्यांनी व लाथांनी मारहाण करत तिला जिवाने मारण्याची धमकी दिली. सदर मारहाणीमध्ये फिर्यादीच्या छातीला, पोटाला, डोक्याला आणि हाता पायाला मार लागला. गावातील बाबुराव वाकळे आणि नामदेव जुमडे यांनी भांडण सोडविले. अशा आशयाची फिर्याद पोलीस ठाणे, लोणार येथे दाखल करण्यात आली.

**०३]** अर्जदाराच्या वतीने विद्वान विधिज्ञ श्री. शिवम पालवे यांनी युक्तिवाद केला की, घटनेच्या दिवशी अर्जदार हा त्याच्या शेतात गेला होता. अर्जदाराची पत्नी व फिर्यादी यांच्यात वाद झाल्याने अर्जदाराविरूद्ध खोटी फिर्याद दाखल करण्यात आली. अर्जदाराविरूद्ध नोंद असलेल्या गुन्ह्यात ७ वर्षापर्यंत शिक्षेची तरतुद आहे. अर्जदाराची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. अर्जदार तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहे.

अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो साक्षीदारांवर दबाव टाकरणार नाही. तसेच न्यायालयाने घालुन दिलेल्या कोणत्याही अटी व शर्तींचे तंतोतंत पालन करेल. म्हणून अर्जदाराला सशर्त अटकपूर्व जामीनावर सोडण्याची विनंती करण्यात आली.

०४] याउलट, विद्वान सरकारी वकील श्रीमती सोनाली सावजी यांनी तपासी अंमलदाराच्या म्हणण्यावर जोर देऊन जामीन अर्जावर प्रखर आक्षेप घेतला. त्यांनी युक्तिवाद केला की, अर्जदाराविरूद्ध विशेष आरोप लावण्यात आले असून अर्जदाराने फिर्यादीचा विनयभंग केला आहे. या प्रकरणाचा तपास प्रगतीपथावर आहे. अर्जदाराला जमानत दिल्यास तो तपासात अडथळा निर्माण करू शकतो. तसेच साक्षीदारांना फितूर करू शकतो. अर्जदाराला जमानत मिळाल्यास तो अशाच प्रकारच्या गुन्ह्याची पुनरावृत्ती करू शकतो. म्हणून अर्जदाराचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली.

०५] दोन्ही पक्षाच्या युक्तीवादाच्या अनुषंगाने केस पेपरची पाहणी केली असता असे दिसून येते की, या प्रकरणातील अपक्ष साक्षीदार नामदेव जुमडे, बाबुराव वाकळे यांनी अर्जदाराविरूद्ध फिर्यादीचा विनयभंग केला असल्याचे व जातीवाचक शिवीगाळ केल्याचे आरोप लावलेले नाहीत. त्यांच्या बयाणावरून अर्जदाराने फिर्यादीला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली असल्याचे दिसून येते. त्यामुळे या सर्व बाबी बचाव पक्षाच्या युक्तिवादाचे समर्थन करतात.

०६] अर्जदाराची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. अर्जदाराविरूद्धचे आरोप पाहता अर्जदाराकडून काहीही जप्त करणे नाही. या प्रकरणात आरोपी/अर्जदार हा तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहे. तसेच अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो जामीन आदेशावरील कुठल्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. याउलट, अभियोग पक्षाला असलेली भीती व साक्षीदारांचे संरक्षण कठोर अटी व शर्ती लादून केले जाऊ शकते. म्हणून प्रकरणातील तथ्य परिस्थिती, अर्जदाराचे कृत्य व तपासाची स्थिती पाहता अर्जदार हा सशर्त अटकपूर्व जामीन मिळवण्यास पात्र आहे. करिता पुढील आदेश पारित करण्यात येतो.

**– आ दे श –**

**०१]** अटकपूर्व जामीन अर्ज क्र. ४४/२०२६ मंजूर करण्यात येतो.

०२] अर्जदार – **श्रीखंड देविदास होळकर** याला अटक होतेवेळेस पोलीस ठाणे, लोणार येथील अपराध क्र. ६२/२०२६, कलम ३३३, ७४, २९६, ११५(२), ३५२, ३५१(२) भारतीय न्याय संहिता खालील गुन्ह्यात त्याचे वैयक्तिक रू. ५०,०००/– चे बंधपत्र व सदर रकमेचा जामीनदार दिल्यानंतर अटकपूर्व जामीनावर सोडण्यात यावे.

०३] अर्जदाराने तपासात सहकार्य करावे आणि दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत दर सोमवारी तपासी अंमलदारपुढे दुपारी ०२.०० ते ०४.०० वाजेच्या दरम्यान हजर राहावे.

०४] अर्जदाराने अभियोग पक्षाच्या साक्षीदारांवर दबाव आणू नये किंवा साक्षीदारांना कोणत्याही स्वरूपाचे प्रलोभन दाखवून फितूर करू नये.

०५] अर्जदाराने दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत मौजे धाड, ता. लोणार या गावात प्रवेश करू नये.

०६] अर्जदाराने यापुढे कोणत्याही स्वरूपाचा गुन्हा करू नये.

०७] अर्जदाराने वरील अटी व शर्तींचा भंग केल्यास त्याची जमानत रद्द करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात लिखित व घोषित)

SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR

Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Date: 2026.03.13 15:26:40 +0530

**(सागर कृ मुंगीलवार)**
**विशेष न्यायाधीश**
**मेहकर**

**दिनांक – ११.०३.२०२६**
**ठिकाण – मेहकर**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
विशेष न्यायाधीश, मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – १, मेहकर

दिनांक – ११.०३.२०२६